# पदभरती जाहिरात

## राष्ट्रीय आरोग्य अभियान,

### जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जिल्हा परिषद, नांदेड

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमातील जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी नांदेड अंतर्गत खालील तक्त्यामध्ये दर्शविल्यसाप्रमाणे कंत्राटी पध्दतीने / करार तत्वावर रिक्त असलेल्या खालील पदांसाठी उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नाव | पदनाम | शैक्षणिक अर्हता | एकत्रीत मानधन प्रति महिना | रिक्त पदांचा संवर्ग | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | NCD -1<br>(D.H. Level) | भिषक<br>(Physician) | MD Medicine/ DNB | 75000/- | Open –1 | – |
| 2 | SNCU-1 , NCD-3<br>(W.H., SDH, RH Level) | वैद्यकिय अधिकारी | MBBS | 60000/- | SC -1<br>ST - 1<br>NT B -1<br>OBC – 1<br>TOTAL - 4 | -- |
| 3 | NTCP -1<br>(D.H. Level) | मानसोपचार तज्ञ<br>(Psychologist) | M.A. Psychology | 30000/- | Open – 1 | -- |
| 4 | RBSK<br>(SDH, RH Level) | वैद्यकिय अधिकारी<br>(पुरुष) | BAMS | 28000/- | NT B -1<br>OBC -2<br>TOTAL - 3 | -- |
| 5 | RBSK<br>(SDH, RH Level) | वैद्यकिय अधिकारी<br>(महिला) | BAMS | 28000/- | ST -2<br>NT C -1<br>SBC - 1<br>OBC -3<br>TOTAL - 7 | -- |
| 6 | AYUSH<br>(SDH Level) | वैद्यकिय अधिकारी<br>(होमियोपॅथी) | UG AYUSH (BHMS) | 28000/- | SC -1 | -- |
| 7 | NPHCE – 1<br>NLEP – 1<br>(DH Level) | भौतिक उपचारतज्ञ<br>(Physiotherapist) | Graduate Degree in Physiotherapy | 20000/- | SC – 1<br>OBC -1<br>TOTAL – 2 | सदर पदाचा एक वर्षाचा अनुभव आवश्यक |
| 8 | Dialysis –1,<br>NBSU – 1<br>NPHCE – 2<br>NCD – 2,<br>NRC -3, Nursing -4,<br>SNCU (Kangaru) -4,<br>Comminity Nurse -1,<br>LHV -1<br>(DH, WH. RH, SDH & PHC Level) | अधिपरिचारीका<br>(स्टाफ नर्स) व एलएचव्ही | GNM/ B.Sc. Nursing | 20000/- | ST – 3<br>VJ – 1<br>SBC – 1<br>OBC – 8<br>SEBC – 2<br>EWC – 2<br>Open - 2<br>TOTAL - 19 | -- |
| 9 | Drug Ware house -1<br>RBSK -4<br>(D.H., SDH, RH Level) | औषध निर्माता | बि.फार्म/डि.फार्म | 17000/- | SC -1<br>OBC – 1<br>SEBC – 1<br>EWC – 1<br>Open – 1<br>TOTAL -5 | सदर पदाचा एक वर्षाचा अनुभव आवश्यक |
| 10 | NOHP -1<br>(District Level) | दंत आरोग्यतज्ञ<br>(Dental Hygenist) | 12th Science and Diploma in Dental Hygienist Course & Registration with State Dental Council | 17000/- | Open – 1 | सदर पदाचा दोन वर्षाचा अनुभव आवश्यक |
| 11 | Nursing School<br>(Dist. Level) | पाठयनिर्देशक | B.Sc. Nurisng<br>(Maharashtra Nursing Council Registration) | 22000/- | OBC – 1 | सदर पदाचा दोन वर्षाचा अनुभव आवश्यक |
| 12 | BPMU -2, RNTCP-1<br>(District & Block Level) | लेखापाल | बी.कॉम, टॅली उत्तीर्ण | 17000/- | ST -2<br>OBC – 1<br>TOTAL – 3 | -- |
| 13 | Quality Assurance.A. -1<br>(District & Block Level) | कार्यक्रम सहाय्यक | कोणत्याही शाखेचा पदवीधर टाईप – मराठी ३० व इंग्रजी ४० उत्तीर्ण, MS-CIT किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण | 17000/- | Open -1 | सदर पदाचा एक वर्षाचा अनुभव आवश्यक |
| 14 | ASHA -1<br>(Block Level) | तालुका समुह संघटक | कोणत्याही शाखेचा पदवीधर टाईप – मराठी ३० व इंग्रजी ४० उत्तीर्ण, MS-CIT किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण | 17000/- | NT B -1 | सदर पदाचा एक वर्षाचा अनुभव आवश्यक |

Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 15 | RKSK – 1<br>NCD – 1<br>(SDH & RH Level) | समुपदेशक | एमएसडब्ल्यु | 17000/- | ST -1<br>SBC - 1<br>**TOTAL – 2** | सदर पदाचा एक वर्षाचा अनुभव आवश्यक |
| 16 | Routine Immunization (Taluka Level) | लसीकरण क्षेत्र सनियंत्रक | कोणत्याही शाखेचा पदवीधर टाईप – मराठी ३० व इंग्रजी ४० उत्तीर्ण, MS-CIT किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण | 20000/- | SC -1<br>OBC – 1<br>**TOTAL – 2** | सदर पदाचा एक वर्षाचा अनुभव आवश्यक |

**अटी व शर्ती–**

१. सदर पदांची नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन दि.३१ मार्च २०२० पर्यंतच्या कालवधी करीता असेल,
२. केंद्र शासनाने संबंधित पद नामंजुर केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता उमेदवारांची सेवा समाप्त करण्यात येईल.
३. सदर सर्व पदांचे वेतन हे एकत्रित मानधनावर आहेत.
४. उमेदवारांची गुणानुक्रमे छाननी करुन त्यातील पात्र उमेदवारांना मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.
५. निवड झालेल्या उमेदवारांची सेवा ही ११ महिण्याकरिता असेल व सदर कार्यक्रमास केंद्र शासनाने/राज्य शासनाने मंजुरी दिल्यास व उमेदवाराच्या ११ महिण्याच्या समाधानकारक कामानुसार पुढील पुनर्नियुक्ती देण्यात येईल.
६. For MBBS Qualification candidates, service under NHM is considered for bond issued by Director Medical Education/Dean GMC.
७. वयोमर्यादा– जाहिरातीच्या दिवशी वैद्यकिय अधिकारी व विशेषतज्ञ या पदाकरिता सेवा प्रवेशाची वयोमर्यादा ७० वर्ष राहील. तसेच सेवा समाप्तीची वयोमर्यादा ७० वर्ष राहील.
नर्सिंग व परामेडिकल स्टाफ पदाकरीता ६५ वर्षे तसेच सेवा समाप्तीची वयोमर्यादा ६५ वर्ष राहील.
इतर पदाकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता ३८ व राखीव प्रवर्गाकरीता ४३ वर्ष राहील.
८. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना ५ वर्ष वयोमर्यादा शिथीलता राहील.
९. ६०वर्षावरील अर्जदारांकरिता जिल्हा शल्य चिकीत्सक प्रमाणित शारिरीक योग्यता (Physical Fitness) प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
१०. All required Qualifications must be full time Course from Government recognized university.
११. जाहिरातीत नमुद पदांची संख्या व मानधन कमी अथवा जास्त होऊ शकते तसेच सदरची भरती रद्द करणे/स्थगीत करणे, निवड /नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करणे, निवड प्रक्रिया संबंधी कोणतेही निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत, निवड झालेल्या कोणत्याही उमेदवारांची नियुक्ती सेवा कालावधीत रद्द करण्याचा अथवा चालु ठेवण्याचा अंतिम अधिकार निवड समिती अध्यक्ष यांचेकडे राखुन ठेवला आहे. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.
१२. प्रत्येक पदाकरिता उमेदवारांनी स्वतंत्र अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. ज्या पदाकरिता अर्ज सादर केला आहे त्याच पदाकरिता ग्राहय धरण्यात येईल.
१३. उच्च शैक्षणिक अर्हता व केवळ शासकिय/निमशासकिय/स्थानिक स्वराज्य संस्थेतील अनुभव धारकास प्राधान्य देण्यात येईल. तसेच पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास अनुभव शिथील करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.
१४. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.१५०/– व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.१००/– चा डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक आहे. डिमांड ड्राफ्टच्या मागे स्वतःचे नाव लिहावे. डिमांड ड्राफ्ट District Integrated Health & Family Welfare Society Nanded किंवा D.I.H.&F.W.S. Nanded या नावे देय असावा. चुकीच्या नावे डि.डी. असल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल.
१५. शैक्षणिक पात्रता पुर्ण करीत नसलेल्या उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल किंवा त्याबाबतचा निर्णय मा.अध्यक्ष, निवड समिती नांदेड हे घेतील.
१६. आवश्यक शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव व आरक्षीत उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना अपात्र ठरविण्यात येईल.
१७. **सदर भरती करीता ईच्छुक उमेदवारांनी विनंती अर्ज A-४ साईजच्या कागदावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे नावाने सादर करावा. अर्जासोबत खालील प्रमाणे सत्यप्रती Self Attested करुन जोडाव्यात.**
   १. अर्जामध्ये ठळक अक्षरात स्वतःचे संपुर्ण नाव, पदाचे नाव, कायमस्वरुपी राहत असलेला पत्ता, दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हतेचे सर्व तपशील – अभ्यासक्रमाचे नाव, संस्थांचे विद्यापिठाचे नाव, उत्तीर्ण झालेले वर्ष, अंतिम वर्षाच्या सर्व गुणपत्रीका, कामाचा अनुभव– काम केलेल्या संस्था/ रुग्णालयाचे नाव, ज्यापदावर काम केले आहे त्या पदाचे नाव, कालावधी, पदाची जबाबदारी व मानधन/वेतन, तसेच इतर सर्व माहिती नमुद करावी.
   २. अर्जासोबत सत्यप्रतीमध्ये असलेले दहावी पासुनचे सर्व गुणपत्रीका व प्रमाणपत्र, शाळेचा दाखला, आधार कार्ड, पासपोर्ट आकाराचा १ फोटो, राखीव प्रवर्गातील असल्यास जातीचे प्रमाणपत्र किंवा जात वैद्यता प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच इतर तांत्रिक ज्ञान असलेले सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहेत. आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल.
   ३. अ.क्र.१ ते १० च्या पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संबंधित कौन्सिलकडे नोंदणी केलेले अद्यावत प्रमाणपत्र अथवा पावतीची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे. अन्यथा उमेदवारास मुलाखतीस अपात्र ठरविण्यात येईल. तसेच सदर पदांसाठी कौशल्य चाचणी व मुलाखत घेण्यात येईल.
   ४. Provisional Registration असणाऱ्या अथवा नोंदणी प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
१८. मुलाखतीकरीता सर्व मुळ कागदपत्र सोबत असणे अनिवार्य आहे मुळ प्रमाणपत्र सोबत नसल्यास अथवा उमेदवारांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रामध्ये दोष अथवा चुकीचे प्रमाणपत्र /दिशाभुल केल्याचे प्रमाणपत्र आढळल्यास त्यांची उमेदवारी /निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करुन संबंधीतावर प्रशासकिय कार्यवाही केली जाईल.
१९. ज्या आशा स्वंयसेविकांनी जी.एन.एम. /ए.एन.एम. चा कोर्स केलेला असेल त्यांना वयाची अट राहणार नाही व त्यांना भरती प्रक्रियेत प्राधान्य देण्यात येईल. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २००९ ते २०१२ या आर्थिक वर्षात शैक्षणिक कर्ज घेतलेले आहे अशा उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
२०. जी.एन.एम. पदाकरीता पुरुष उमेदवारांनी अर्ज करु नयेत केल्यास अपात्र केल्या जाईल.

Scanned by CamScanner

२१.करार पध्दतीने नेमणुका करावयाच्या असल्याने एकत्रित मानधना शिवाय अन्य कोणताही भत्ता वगैरे लागु नाही. तसेच मुलाखती करीता येणाऱ्या उमेदवारास कोणताही भत्ता देय राहणार नाही.

२२.अ.क्र.१ ते १० करीता शासकिय सेवेतुन सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्ती कर्मचारी अर्ज करित असल्यास त्यांनी शासकिय सेवेत रुजु झाल्याच्या दिनांक, कार्यकाळ, पदनाम, सेवा निवृत्त झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन) आणि यापूर्वी कंत्राटी पध्दतीने कोणत्याही कार्यक्रमात काम केले असल्यास त्याबाबतची सर्व माहिती अर्जामध्ये नमूद करावी आणि त्याच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडाव्यात.

२३.सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची निवड झाल्यास त्यांचे मानधन राज्यस्तरावरुन प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल.

२४.सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची निवड झाल्यास त्यांच्या सेवा काळामध्ये अथवा सेवानिवृत्तीनंतर कोणत्याही स्वरुपात चौकशी अथवा प्रकरण पंलंबित नसल्याचबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याकरिता मा.आयुक्त, आरोग्य सेवा मुंबई यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल सदर प्रस्तावास मंजुरी प्राप्त झालयानंतरच संबंधितास नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येतील. तसेच रुजु होण्याकरिता त्यांना जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रुग्णालय, नांदेड यांचे शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असलयाबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२५.निवड झालेल्या उमेदवारांने आपली सेवा कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याबाबत रु. १००/- च्या बॉन्ड पेपरवर विहीत नमुन्यात करारनामा देणे बंधनकारक आहे.

२६.उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जांचे संख्येनुसार अर्जांची छाननी करुन पात्र अर्ज जास्त प्रमाणात प्राप्त झाल्यास पदनिहायस १:५ (एकास पाच) प्रमाणे गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना मुलाखतीकरीता व आवश्यक पदांस कौशल्य चाचणी करीता बोलावण्यात येईल.

२७.निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र/अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२८.उमेदवारांच्या पदनिहाय थेट मुलाखत व कौशल्य चाचणी खाली दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे **जिल्हा प्रशिक्षण केंद्र, मल्टी पर्पज हायस्कुलच्या मागे, वजीराबाद नांदेड** येथे होईल. सदरील वेळेत उपस्थीत न राहील्यास आपणास अपात्र ठरविण्यात येईल.

२९.सदर जाहिरात, भरती प्रक्रियेसंबंधी आवश्यक सुचना, पात्र/अपात्र यादी तसेच निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे, इ. बावत सविस्तर तपशिल वेळोवेळी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा परिषद नांदेड येथे व zpnanded.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

३०.दि.१६/०९/२०१९ पर्यंत सायं.५:३० पर्यंत कार्यालयीन वेळेत (शासकिय सुट्टया वगळुन) प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाईल. तद्नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

३१.उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा खाजगी किंवा राजकीय दबाव आणल्यास त्यांच्या मुलाखती किंवा नियुक्ती रद्द करण्यात येईल.

३२.खालील तक्यात दिल्यानुसार सदरील भरतीचे वेळापत्रक असुन त्यानुसार कार्यवाही होईल.

- **पदभरतीचे स्थळ व वेळ:- जिल्हा प्रशिक्षण केंद्र, मल्टी पर्पज हायस्कुलच्या मागे, वजीराबाद नांदेड**

वेळापत्रक

| | |
|---|---|
| अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख | दि.१६/०९/२०१९ |
| अर्जदारांची पात्र /अपात्रतेची यादी प्रसिध्द करणे | दि.२४/०९/२०१९ ते २६/०९/२०१९ |
| कागदपत्रांची छाननी करुन अपात्र असलेल्या अर्जदारांच्या हरकती मागविणे | दि.२७/०९/२०१९ ते ३०/०९/२०१९ |
| १:५ प्रमाणे मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांची यादी लावण्याची तारीख | दि.४/१०/२०१९ |

- **मौखिक व कौशल्य चाचणी घेण्याची तारीख**

| | |
|---|---|
| पद क्र.०१ ते ०७ | दि.०९/१०/२०१९ |
| पद क्र.०८ ते १६ | दि.११/१०/२०१९ |

-स्वाक्षरीत-
अध्यक्ष, निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

Scanned by CamScanner